# समृद्धी महामार्गावर ट्रकवर धडकली ट्रॅव्हल्स

**1 ठार, 10 प्रवासी गंभीर, ओव्हरटेक करण्याच्या नादात घडला अपघात**



## समृद्धी महामार्गावर पहाटेचा आक्रोश आणि आकांत





**महासागर प्रतिनिधी**
**धामणगाव रेल्वे ( दि. 15 )** – ओव्हरटेकच्या नादात पुण्याहून नागपूरच्या दिशेने भरधाव जाणारी ट्रॅव्हल्स ट्रकला मागून जाऊन धडकली. समृद्धी महामार्गावर घडलेल्या या भीषण अपघातात ट्रॅव्हल्सचा चालक संतोष राम परिहार (42,येरवडा, पुणे) याचा जागीच मृत्यू झाला. अपघात 10 ते 12 प्रवासी जखमी आहे. बुधवारी (दि.15) पहाटे 5.30 च्या सुमारास हा भीषण अपघात झाल्यानंतर प्रचंड किंचाळ्या व आक्रोश सुरु झाला. या घटनेच्या माहितीवरून मंगरूळ दस्तगीर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळ गाठून जखमींना धामणगाव व पुलगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. काही जखमी प्रवाशांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

मिळालेल्या माहितीनुसार, धामणगाव रेल्वे तालुक्यात समृद्धी महामार्गालगत असलेल्या आष्टा गावातील चॅनल क्रमांक 90 जवळ हा अपघात झाला.

या ठिकाणी मर्सिडीज बेंझ कंपनीची आधुनिक लक्झरी बस एमपी-45/झेडएफ-8849 ने ओव्हरटेक करण्याच्या नादात ट्रक क्रमांक एमएच 04 जीएल 0517 मागून धडक दिली. बसमध्ये 27 प्रवासी प्रवास करत होते. अपघात इतकी भीषण होता कि, ट्रॅव्हल्सच्या धडकेनंतर ट्रक रस्त्याचा सुरक्षा कठडा तोडून दूरवर जाऊन पडला. या भीषण अपघातानंतर ट्रॅव्हल्स बस चालक संतोष परिहार याचा जागीच मृत्यू झाला. तर 10 प्रवाशी गंभीर जखमी झाले.

त्यांना धामणगाव रेल्वे व यवतमाळ येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. किरकोळ जखमी असलेल्या प्रवाशांना प्राथमिक उपचारानंतर घरी पाठविण्यात आले. तर काही प्रवाशांना पुलगाव येथे दाखल करण्यात आले आहे.

### जखमींना वेगवेगळ्या रूग्णालयात हालविले

पहाटे कडाक्याच्या थंडीत झालेल्या या अपघातामुळे एकच खळबळ उडाली होती. समृध्दी महामार्गावर अपघात झाल्याची माहिती मिळताच मंगरूळ दस्तगीर चे ठाणेदार गौतम इंगळे यांनी कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी पोहोचून जखमी प्रवाशांना उपचारासाठी रुग्णालयात पाठवले. समृद्धी महामार्गावर सातत्याने अपघात होत आहेत. पहाटेची वेळ असल्याने ट्रॅव्हल्स बस चालकाला झोपेची डुलकी लागली अथवा ओव्हरटेक करण्याचा नादात हा अपघात झाला असावा, असा कयास आहे.

### काचा फोडून प्रवाशांना काढले बाहेर

अपघातानंतर प्रवाशांनी आरडाओरडा सुरू केली होती. काही प्रवाशांना काचा फोडून बसच्या बाहेर काढण्यात आले. अपघातात जखमी झालेल्यांमध्ये गणेश भरत गोळे (19, पुणे, बाणेर), आर. एन. नीलेश बधगणे (23, शिक्षक नगर, कोथरूड, पुणे), संतोष नामदेव शेलार (40, अहमदनगर), दीपक पोपट शिंदे (31, पुणे), योगेश राजकुमार ठगाणी (26, दयालनगर, वर्धा), विनय अशोक मुकेवार (26, रा. ठक्कर कॉलनी, नवीना पार्क, चंद्रपूर), अनिता सतीश नायक (61, लोधीपुरा, नागपूर), सुरेंद्र साहेबराव शिरसाठ (56, वानाडोंगरी, हिंगणा रोड), सोनूकुमार साहू (23, प्रयागराज), शाबा शेख मोहम्मद याहया शेख (30, घाटकोपर, चिरागनगर, मुंबई) यांचा समावेश आहे.

# अवैध वाळू तस्करी करणारे चार ट्रक पकडले

- वाळू तस्करांवर महसूल विभागाची धडक कारवाई
- कारवाईत 40 ब्रास वाळूसह 16 लाखांचा मुद्देमाल जप्त



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूरबाजार ( दि. 15 )** – आक्टोंबरपासून महसूल विभाग निवडणुकीत व्यस्त होता. याचा गैरफायदा घेऊन तालुक्यातील वाळू तस्कर मोकाट सुटले होते. निवडणूकीदरम्यान विस्कटलेली कारभाराची गाडी सुरळी रूळावर आली. त्यानंतर स्थानिक महसूलने वाळू तस्करांवर धडक कारवाई करायला सुरुवात केली. 14 व 15 जानेवारी या दोन दिवसांत महसूल विभागाने वाळूसह चार ट्रक पकडले. यामध्ये दोन टिप्पर व दोन मोठ्या ट्रकचा समावेश आहे. या कारवाईत 40 ब्रास वाळूसह एकूण 16 लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

14 जानेवारीला नानोरी गावा जवळ सकाळी 10 वाजता करण्यात आलेल्या कारवाईत 10 ब्रास वाळू सह एक टिप्पर पकडण्यात आला. तर 15 जानेवारीला सकाळी सहा वाजता मोर्शी रोडवरील, भारत पेट्रोल पंपाजवळ कारवाई करण्यात आली. या कारवाईत 30 ब्रास वाळू सह तीन ट्रक जप्त करण्यात आले. यात एक टिप्पर व दोन मोठ्या ट्रकचा समावेश आहे. सर्व वाहने वाळूसह जप्त करून तहसील कार्यालयात आणण्यात आली. सदर वाळू जप्तीची प्रकरणे पुढील कायदेशीर कारवाईसाठी उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव अचलपूर यांचेकडे पाठविण्यात आले आहे. कारवाईनंतर या सर्व वाहनधारकांकडून वाळूची किंमत व वाहनावरील दंड वसूल करण्यात येणार आहे. या दोन्ही कारवाईत तहसीलदार रामदास शेळके, नायब तहसीलदार लक्ष्मीकांत तिवारी, मनोज सोनारकर, मनिष यंबलवार यांच्यासह ग्राम महसूल अधिकारी विलास ढोले, प्रतिक चव्हाण, महसूल सेवक श्रीकांत पवार, वाहन चालक नंदकुमार पावडे ईत्यादिंनी सहभाग घेतला.

# सांगळूदकर महाविद्यालयाच्या प्राचार्याची आगपाखड

**दै. महासागरची बातमी लागली जिव्हारी**




ऐन परीक्षेच्या काळात स्नेहसंमेलनाची धूम!
जे.डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालयातील प्रकार ■ विद्यार्थ्यांचा हिरमोड

महासागर प्रतिनिधी
दर्यापूर, (दि.14)- येथील जे.डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालयात ऐन परीक्षेच्या कालावधीत सांगळुदकर महाविद्यालयात स्नेह संमेलनाची धूम पहावयास मिळत आहे. तर दुसरीकडे परीक्षा सुरू असल्याने विद्यार्थी अभ्यासात व्यस्त असल्याचे चित्र आहे. त्यामुळे परीक्षा देत असलेल्या विद्यार्थ्यांचा हिरमोड झालेला आहे.
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या हिवाळी 2024 च्या परीक्षेला सुरुवात झाली आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत जे. डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालयात विद्यापीठाची परीक्षा दि. 14 ऑक्टोबर 2024 पासून सुरू झाली आहे. ही परीक्षा 7 फेब्रुवारी 2025 ला संपणार आहे, अशी माहिती परीक्षा विभागातून मिळाली आहे. स्नेहसंमेलन परीक्षा कालावधी येत असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांची अनुपस्थिती दिसून येत आहे. परीक्षा संपल्यानंतर महाविद्यालयाने स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे होते. असा सुर विद्यार्थी, पालक वर्गाकडून येत आहे. याकडे महाविद्यालयाचे प्राचार्य, आयोजन समितीने विशेष लक्ष देण्याची गरज होती. जे विद्यार्थी परीक्षेला बसले आहे त्या विद्यार्थ्यांना स्नेहसंमेलनाचा आस्वाद घेता आला नाही. त्यामूळे त्यांचा महाविद्यालय व्यवस्थापनाविरुध्द चांगलाच रोष पहायला मिळत आहे.

**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर,( दि.15 )** – 'ऐन परीक्षेच्या काळात महाविद्यालयात स्नेहसंमेलनाची धुम' या शीर्षक खाली दि. 15 जानेवारी रोजी दै. महासागर कडुन बातमी प्रकाशित करण्यात आली होती. ही बातमी येथील जे.डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयाच्या प्राचार्याच्या चांगलीच जिव्हारी लागल्याचे दिसून आले. या बातमी संदर्भात त्यांनी केलेली आगपाखड संपूर्ण महाविद्यालयाने अनुभवली.

शिवाजी शिक्षण संस्थेअंतर्गत जेडी पाटील सांगळूदकर महाविद्यालय तालुक्यातील नामांकित असे महाविद्यालय आहे परंतु गेल्या वर्षभरा पासून या महाविद्यालयाचा कारभार पूर्णत: ढेपाळल्याचे पहायला मिळत आहे. येथील अस्वच्छता व अव्यवस्थेवर दैनिक महासागर मे वारंवार प्रहार केले आहे. मात्र तरीही निगरगट्ट झालेले येथील प्राचार्य सुधरायचे नाव घेताना दिसत नाही. वर्षभर जे विद्यार्थी स्नेह संमेलनाची वाट पाहतात नेमके त्या स्नेहसंमेलनाचे आयोजन ऐन परीक्षा कालावधीत करुन विद्यार्थ्यांच्या भावनांशी खेळ केल्याचा प्रकार दैनिक महासागर ने उघडकीस आणला. मात्र प्रकाशित केलेले हे वृत्त जिव्हारी लागल्याने त्यांनी बातमीदार महेश बूंदे यांच्याशी महाविद्यालयाच्या परिसरात गैर वर्तणूक करत त्यांना अपमानास्पद वागणूक दिली.

हा लोकशाहीच्या चौथ्या आधार स्तंभाचा आवाज दाबण्याचा प्रयत्न त्यांनी केला. आमच्या प्रतिनिधिला सदर कार्यक्रमाची महाविद्यालयाने निमंत्रण पत्रिका देत बोलावून केलेल्या अपमानाचा दर्यापुर पत्रकार संघटनेकडून निषेध व्यक्त केला जात आहे.



# दैव बलवत्तर म्हणून वाचले युवकाचे प्राण!

**महासागर प्रतिनिधी**
**हिवरखेड, ( दि.15 )**– हिवरखेड व परीसरातील गावांमध्ये पतंगाचा हंगाम सुरू झाला आहे.परंतु हा धोकादायक बनला आहे. मांज्याच्या रुपात अनेकांना यमाचे दर्शन होत आहे. असेच एका युवकाचे दैव बलवत्तर म्हणून एक युवकाचे थोडक्यात प्राण वाचले दि.14 जानेवारीला ला हिवरखेड येथील युवक विक्की रविंद्र काळे हा आर्वी वरुन हिवरखेडला येत असतांनाच तळेगाव शामजी पंत येथील हायवेवर कटलेल्या पतंगीचा मांजा त्याचा गळ्यात अडकला. मात्र दैव बलवत्तर म्हणून त्याच्या दुचाकीचा वेग कमी असल्याने मोठा अनर्थ टळला. अशीच घटना नुकतीच गावात घडली होती. पतंगीच्या मागे धावत असलेला मुलगा घरावरुन खाली कोसळला होता.

### पतंग उडविण्याची वेगळीच शक्कल

मुले पतंग उडविण्यासाठी वेगवेगळी शक्कल लावत आहे. तसेच पतंगाचा मांजा तयार करण्यात व्यस्त असल्याचे दिसून येतात. तर कुठे पतंगाचा मांजा गुंडाळण्यासाठी सायकलचा उपयोग करून घेतांना दिसतात. तर कटलेली पतंग पकडण्याकरिता जीवाचे रान करतात जे धोकादायक ठरू शकते त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्यांना पतंग उडविण्यापासून परावृत्त केले पाहिजे.

# इतवारा बाजारातील रस्त्यांनी घेतला मोकळा श्वास

- अतिक्रमण निर्मूलनाची महापालिकेची मोठी कारवाई
- उपायुक्त डॉ.मेघना वासनकर यांनी केली पाहणी



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.15 )** इतवारा बाजार परिसरात अनेक दिवसापासून दुकानदाराने अनधिकृतपणे अतिक्रमण केलेले अतिक्रमण 15 जानेवारी रोजी बाजार परवाना विभागामार्फत काढण्यात आले. सहा ट्रक साहित्य जप्त करण्यात आले. यावेळी अमरावती महापालिका उपायुक्त डॉ.मेघना वासनकर यांनी इतवारा बाजार या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

या कारवाईत कटले, हातगाड्या, अनधिकृत साहित्य, टेबल, लोखंडी साहित्य, बासे तसेच इतर साहित्य जप्त करण्यात आले. नागरिकांनी या कार्यवाहीबाबत समाधान व्यक्त केले. त्या अनुषंगाने उपायुक्तांच्या नियंत्रणाखाली बाजार परवाना अधिक्षक आणि संबंधित अधिकारी, कर्मचारी या कार्यक्षेत्रात दक्षतेने कार्यरत होते. इतवारा बाजार परिसरात अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई उपायुक्त डॉ.मेघना वासनकर यांच्या उपस्थितीत करण्यात आली. प्रत्येक दुकानदाराने डस्टबीन ठेवण्याचे निर्देश यावेळी उपायुक्त यांनी दिले. सदर दुकानदाराने परिसर स्वच्छ ठेवावे असे निर्देशही यावेळी देण्यात आले. इतवारा बाजार परिसर संपूर्ण स्वच्छ व्हावा याच्यासाठी या परिसरातील स्वच्छता कर्मचारी, दुकानदार यांनी संयुक्त स्वच्छता मोहीम राबावावी अशा सूचना यावेळी त्यांनी दिल्या.

### नालीवर दुकान लावल्यास खबरदार

या परिसरात नालीवर कोणीही दुकान लावू नये असे सक्त निर्देश उपायुक्त यांनी दिले. शहरातील अतिक्रमण, पदपथांवर मुक्काम ठोकणारे फिरस्ते आणि अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून संयुक्त कारवाई केली जात आहे. पाहणी दरम्यान प्रत्येक दुकानदाराशी भेट घेवून त्यांच्याशी चर्चा केली. या परिसरातील अनधिकृत फेरीवाल्यांवर महापालिका धडक कारवाई केली. शहरात रस्त्यावर अतिक्रमण करून व्यवसाय घाटणाऱ्या अतिक्रमणधारकांवर अमरावती महानगरपालिकेची कारवाई सुरूच आहे. शहरातील विविध भागात मनपाद्वारे अतिक्रमण निर्मूलन मोहीम मागील काही दिवसांपासुन सातत्याने सुरु असुन इतवारा बाजार परिसरातील अतिक्रमण मोठ्या प्रमाणात काढून रस्ते मोकळे करण्यात आले.

### फुटपाथवरील अतिक्रमण हटविले

मनपाच्या पथकाने फुटपाथवर केलेली पक्के बांधकाम, दुकानांसमोरील बांधकाम केलेले रॅम्प, कच्चे व पक्के शेड तोडले. फुटपाथवर ठेवण्यात आलेले साहित्य सुद्धा जप्त करण्यात आले. इतवारा बाजारात खरेदीदारांची गर्दी असते, मात्र दुकानदारांच्या अतिक्रमणामुळे पायी चालणाऱ्याला सुद्धा मार्ग काढणे कठीण जाते. त्यामुळे फुटपाथवरील अतिक्रमण सुध्दा हटविण्यात आले. या पाहणी दरम्यान सहायक आयुक्त भुषण पुसतकर, बाजार परवाना अधिक्षक उदय चव्हाण, अतिक्रमण विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

# घुईखेडच्या ऊर्जा प्रभाग संघाची तृतीय वार्षिक सर्वसाधारण सभा

### विविध उपक्रमांचे आयोजन



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे,( दि.15 )** – तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, चांदूर रेल्वे अंतर्गत ऊर्जा प्रभाग संघ, घुईखेड ची तृतीय वार्षिक सर्वसाधारण सभा संत उदाशी महाराज संस्थान, निंभा येथे पार पडली.

सर्वसाधारण सभेचे उद्घाटन गट गटविकास अधिकारी तेजश्री आवळे यांनी केले. तर सभेचे अध्यक्षस्थान प्रभाग संघ अध्यक्ष अंबिका झाडे यांनी भूषविले. सभेला मार्गदर्शन म्हणून समाजकार्य महाविद्यालय अमरावतीचे माजी प्राचार्य डॉ. दिलीप काळे, ?ड. ललीत कदम, निंभा येथील सरपंच गजानन देशमुख, बीएमएम अमोल पेठे, बँक मॅनेजर श्री. दुथडे यांची उपस्थिती होती. यावेळी आरोग्य तपासणी कॅम्प, विविध संस्कृतिक स्पर्धा, बँक कर्ज वाटप, उत्कृष्ठ काम करणाऱ्या कॅडर व उद्याजक महिलांचा सत्कार इत्यादी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे संचालन दीपिका मोहोळ यांनी केले तर आभार प्रदर्शन सारिका देऊळकर यांनी केले.


कार्यक्रमाला सविता थेटे, अमित ढवळे, संघदिप दुर्याधन, मोनिका मुनघाटे, रेखा खेडकर, सोनिया चौहान, ऊर्जा प्रभाग प्रभाग संघाच्या सचिव अर्चना हजारे, कोषाध्यक्ष जयश्री जांभुळकर, प्रांजना काळे, वर्षा व्यास, प्राची खडसे तसेच घुईखेड प्रभागातील संपूर्ण समुदाय संसाधन व्यक्ती, प्रतिष्ठित नागरिक, समूहातील महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सांगता आदर्श सरपंच तथा स्वराज्य ग्रामसंघ अध्यक्ष विजया चवाळे यांच्या महिल्लोन्नती गीताने करण्यात आली.

### चाकूच्या धाकावर मोबाईल हिसकावला

**अमरावती** – चाकुचा धाक दाखवून एका तरुणाजवळील मोबाईल हिसकावून नेल्याची घटना 13 जानेवारी रोजी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. शहराजवळील अर्हाड-कर्हाड येथील रहिवासी गोकुळ विलासराव थेटे (33) हे मजुरीचे काम करून दुचाकीवरून घरी जात होते. दरम्यान मंगलधाम कॉलनीतील कच्च्या रस्त्यावर चार अनोळखी तरुणांनी त्यांना अडवून चाकूचा धाक दाखवून मोबाईल हिसकावला. गोकुळ थेटे यांच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी चार अज्ञात तरुणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# वरुडमध्ये त्रिशूल दिक्षा कार्यक्रम

**युवकांना संस्कारीत करून शौर्य जागरण करण्याचा मानस**



**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.15 )**– विश्व हिंदू परिषद बजरंग दल, वरुड मोर्शी प्रखंड, अमरावती ग्रामीण तर्फे येणाऱ्या 21 जानेवारीला ला वरुडमध्ये त्रिशूल दिक्षा कार्यक्रम आयोजित केला आहे. हिंदू धर्मातील युवकांना संस्कारीत करून त्यांच्यात शौर्य जागरण करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.


हिंदु युवकांना त्रिशूल दिक्षा देऊन धर्म, संस्कृती आणि राष्ट्राची रक्षा करण्यासाठी प्रेरित करणे हा आहे. या अभियानातुन हिंदू युवकांनां लव जिहाद, धर्मांतरण, गोवंश हत्या व आपल्या मंदिराची होत असलेली विडंबना सारख्या गतीविधिचा विरोध करण्याची शपथ दिली जाते. सोबतच त्यांना आत्मरक्षा आणि धर्मरक्षाची सुद्धा शपथ दिली जाते. तसेच या त्रिशूल दिक्षेचा गैरवापर न करण्याचा पण संकल्प घेतला जाते. फक्त आणि फक्त धर्म, देश आणि संस्कृतीची रक्षा करण्यासाठीच याचा उपयोग करण्याची शपथ दिली जाते.

हा कार्यक्रम शहरात 21 जानेवारीला सकाळी 10 वाजता काठीवाले सभागृहमध्ये आयोजित केला आहे. सोबतच वरुड शहरातून सर्व त्रिशूल दिक्षा घेतलेल्या बजरंगीचे शौर्य संचलन निघणार आहे. शौर्य संचलन काठीवाले सभागृहापासून शहरातील मुख्य चौकातून परत काठीवाले सभागृह येथे परत येणार आहे. या कार्यक्रमाला नागपूर महानगर मंत्री अमोल ठाकरे संबोधित करणार आहे. तसेच या कार्यक्रमाला ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज पातशे, धर्माचार्य, वि.हि. प.,ह. भ. प. शालिकराम महाराज खेडकर,धर्माचार्य, वि. हि. प., व ह. भ. प. पियूष महाराज यावले, धर्माचार्य, वि. हि. प. वरुड प्रखंड उपस्थित राहणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती बंटी पारवानी, (विभाग मंत्री, वि. ही. प. अमरावती विभाग), वि.ही.प. अमरावती ग्रामीण उपाध्यक्ष प्रदीप ठोसर, अमरावती ग्रामीण जिल्हा मंत्री रुपेश राऊत, अमरावती ग्रामीण जिल्हा बजरंग दल संयोजक विक्रम काळे, अमरावती ग्रामीण जिल्हा बलोपासना प्रमुख विक्रमसिंग ठाकूर,अमरावती ग्रामीण जिल्हा धर्मप्रसार प्रमुख राजेश घोडकी आदी उपस्थित राहतील.

या कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने हिंदू युवकांनी उपस्थित राहून त्रिशूल दिक्षा घावी व शौर्य संचलनमध्ये भाग घ्यावा असे आवाहन वि. ही. प. अमरावती ग्रामीण जिल्हा सहमंत्री चारुदत्त मोहोड आणि योगेश मोरगडे, जिल्हा सहधर्मप्रसार प्रमुख नितीन कुबडे, जिल्हा गौरक्षा प्रमुख आकाश वघाळे, वरुड प्रखंड बजरंग दल संयोजक वैभव गणोरकर, मोर्शी प्रखंड बजरंग दल संयोजक पंकज पवार, वरुड नगर बजरंग दल संयोजक योगेश अडलक, मोर्शी नगर बजरंग दल संयोजक ऋतिक अमझरे यांनी केले आहे.

# शिशूसंस्कार म्हणून लहान मुलांना बोरन्हाण

**परंपरा टिकवण्याची गरज**





**महासागर प्रतिनिधी**
**पथ्रोट ( दि.15 )**– संक्रांतीच्या दिवशी लहान मुलांना 'बोरन्हाण' (लूट)घातले जाते. शिशूसंस्कार म्हणून लहान मुलांना बोरन्हाण घातले जाते. लहान मुलांच्या उत्तम आरोग्यासाठी बोरन्हाण घालण्याची ही पारंपरिक पद्धत आहे. पण पारंपरिक प्रथेपेक्षाही यामध्ये शास्त्र आहे हे विशेष.

सक्रात करी दिनाला लहान मुलं असणाऱ्या घरी बोरन्हाण सोहळा साजरा केल्या गेला.

सर्वसाधारणत: बाळाचा जन्म झाल्यानंतर पहिल्या संक्रांतीला बोरन्हाण घातले जाते. शिशुसंस्कार अशी त्याची व्याख्या आहे. मात्र लहान मुलांना उत्तम आरोग्य लाभावे म्हणून बोरन्हाण घालण्याची पारंपरिक पद्धत आजपर्यंत करण्यात येते. ही जरी पारंपरिक पद्धत असली तरीही शास्त्रानुसार, संक्रांतीनंतर ऋतूमध्ये बदल होताना जाणवतो. त्या बदलाची बाळाच्या शरीराला सवय नसते. त्यामुळे अशा ऋतुची बाधा होऊ नये म्हणून मुलांना बोरन्हाण घातले जाते.

यावेळी उसाचे पेरं, भुईमूगाच्या शेंगा, बोर, वाटाणा शेंगा, हरभरा गाठे, पेरु , गांजर अशा फळांचा उपयोग करून मुलांच्या डोक्यावरून टाकले जातात. यावेळी इतर लहान मुलांना बोलावलं जातं. नुसती दिली तर लहान मुलं फळं खात नाहीत. पण अशा खेळातून ते फळांचा आस्वाद घेतात आणि त्यांना फळं खाण्याची सवय लावणेही सोपे होते. तसंच पालकांना आपल्या बाळाच्या आरोग्यासाठी काय योग्य आणि काय अयोग्य हे या निमित्ताने कळते. मुलांनी ही फळे खाल्ल्यामुळे बदलत्या वातावरणात शरीर सुदृढ राहण्यास बळ मिळते असे सांगण्यात येते.

### तिळगुळ घ्या, गोड गोड बोला

आज बदलत्या जीवनशैलीमुळे सण साजरे करण्यासाठी वेळ आहे की नाही हे पाहावे लागते पण आपली परंपरा टिकवणे ही आपली जबाबदारी आहे. हे सण साजरे करण्यासाठी मोठा सोहळा आवश्यक नसतो. तर लोकांनी एकमेकांच्या घरी जाऊन तो सण साजरा करणे महत्वाचे असते. वर्षाच्या सुरुवातीला येणारा हा सण 'तिळगुळ घ्या, गोड गोड बोला' असे म्हणायला लावतो. त्यामुळे संपूर्ण वर्षभर आपल्यातील आपुलकी आणि सलोखा टिकून राहण्याची प्रेरणा वाटलेल्या साखर फुटाण्यातून मिळत असते .शिवाय आरोग्याच्या दृष्टिने महत्वाचा तिळगूळही पोटात जातो.


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४